रोजगार हमी योजना

रोजगार हमी योजनेंतर्गत कामातील निलंबन/अधिक देयक-

अधीक्षक अभियंत्यांनी करावयाची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : रोहयो-१२०३/प्र. ४५/रोहयो-२

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक २८ ऑगस्ट २००३

संदर्भ :--शासन परिपत्रक क्रमांक रोहयो-११९१/प्र. ७९/रोहयो-१, दिनांक १९ सप्टेंबर १९९१.

## परिपत्रक

वना

रोजगार हमी योजनेखाली घेण्यात येणाऱ्या पाझर तलाव, गाव तलाव, साठवण तलाव, नालाबंडिंग, सी.सी.टी., टि.सी.एम्., वृक्षारोपण, ...डी, इत्यादींसारखी जलसंधारणाची कामे आणि रस्त्यांची कामे यांचे सुधारित अंदाजपत्रक तयार करताना, अशा कामांना अतिप्रदान होऊन ...ाचे आर्थिक नुकसान झाल्याच्या घटना समोर येतात. अशा गैरव्यवहाराच्या बाबी रोहयोखाली कामांची वेगवेगळ्या स्तरावरून (कार्यान्वयीन ...चे वरिष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, आयुक्त कार्यालय आणि शासन स्तरावरील अधिकारी) तपासणी करीत असतानापण निदर्शनास ... या अतिप्रदान झालेल्या कामांचे निश्चितपणे परिमाण आणि मूल्यांकन ठरविणे हे आवश्यक आहे. अशा बाबी या आर्थिक नुकसानीच्या ...याने यास संबंधित अधिकारी/कर्मचारी हे शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरत असतात आणि प्रकरणे चौकशीसाठी प्रस्तावित केली जातात ...शीमध्ये गैरव्यवहाराची ही बाब अचूक राहण्याच्या दृष्टीने अतिप्रदानाचे निश्चितीकरण एका त्रयस्थ व्यवस्थेकडून होण्याची गरज असते ...धात रोहयोशी संबंधित सर्व कार्यान्वयीन यंत्रणांचा समावेश करून सविस्तर सूचना काढण्याची गरज शासनाच्या विचाराधीन होती. ...ात शासनाने संदर्भाधीन आदेशान्वये सूचना दिलेल्या होत्या. त्या सर्व सूचना अधिक्रमित करून शासन पुढील सूचना देत आहे :-

(१) वरील प्रकारचे अधिक प्रदान झाल्याची घटना लक्षात आल्यानंतर गैरप्रकारातील रक्कम लहान वा मोठी असो, अशा प्रकारचे प्रकरणे संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांनी वा तपासणीशी संबंधित असणाऱ्या प्राधिकरणांने (कार्यान्वयीन यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी, आयुक्त, शासन) खालील प्रकारे अधीक्षक अभियंत्यांच्या निदर्शनास आणावीत.

| | |
|---|---|
| १. रोजगार हमी योजनेअंतर्गत पाटबंधारे खात्याशी संबंधित कामे | संबंधित पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता. |
| २. रोजगार हमी योजने अंतर्गत जल संधारण खात्याशी संबंधित कामे | संबंधित जलसंधारण मंडळाचे अधीक्षक अभियंता (स्थानिक स्तर) |
| ३. रोहयो अंतर्गत रस्त्याची कामे | सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित अधीक्षक अभियंता. |
| ४. रोहयो अंतर्गत कृषि, सामाजिक वनीकरण, वन विभागाशी संबंधित कामे | संबंधित विभागातील जलसंधारणाचे अधीक्षक अभियंता (स्थानिक स्तर). |

(२) संबंधित अधीक्षक अभियंत्यांनी अशी प्रकरणे त्यांच्या निदर्शनास आणल्याबरोबर वरील प्रकारे अतिप्रदान होऊन ... झालेल्या अतिप्रदान कामाची संयुक्त मोजमापे घेण्याची आवश्यकता असेल त्यावेळी त्यासाठी २ उपअभियंत्यांची नियुक्ती करावी. ... १ उपअभियंता ज्या कार्यकारी अभियंत्याच्या विभागामध्ये काम असेल त्या विभागाच्या कार्यक्षेत्राबाहेरील असावा. म्हणजेच दोन्ही उपअभियंता एकाच कार्यकारी अभियंत्याच्या विभागातील असू नयेत. कृषि, सामाजिक वनीकरण व वन विभागाशी संबंधित कामा... बाबतीत अधीक्षक अभियंता (स्थानिक स्तर) यांनी अशा कामांशी संबंध नसलेल्या संबंधित खात्याचा तालुका स्तरावरील (उदा. तालुका कृषि अधिकारी, सहायक उपसंचालक, रेंज फॉरेस्ट अधिकारी) एक अधिकारी व त्या तालुक्याच्या बाहेरील एक जलसंधारणाचा उपअभियंता अशा प्रकारे दोन अधिकाऱ्यांची नेमणूक करावी.

,संयुक्त मोजणीच्या प्रक्रियेत पारदर्शकता ठेवण्याच्या दृष्टिकोनातून अशा प्रत्येक संयुक्त मोजणीच्या वेळी संबंधित ग्रामपंचायतीचे
सरपंच वा उप सरपंच वा त्या विभागातील इतर मान्यवर व्यक्ती यांनाही उपस्थित राहण्यासाठी विनंती करावी: त्यांच्या उपस्थितीत संयुक्त
मोजणीची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा, म्हणजे पुढील गुंतागुंत कमी होण्यास मदत होते.

(३) संयुक्त मोजमापे घेताना संबंधित काम कार्यान्वीत करणारे अधिकारी/कर्मचारी उदा. उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, तालुका
कृषि अधिकारी, रेंज फॉरेस्टर ऑफीसर, सहायक सहसंचालक, कनिष्ठ अभियंता इत्यादी (ज्यांचा अशा गैरप्रकाराशी संबंध असेल त्यांना)
यांना संबंधित अधीक्षक अभियंता यांनी स्वतः लेखी नोटीस पाठवून संयुक्त मोजमापाच्या वेळी हजर राहण्यास आदेशित करावे. अशा
प्रकारे नोटीस त्यांना मिळाल्याची खात्री करावी. यासाठी त्यांना २ लेखी संधी द्याव्यात व तिसऱ्या वेळेस त्यांच्या कार्यालयास वा त्यांच्या
निवासस्थानाच्या अधिकृत पत्त्यावर कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्याच्या वा निवासस्थानाच्या शेजारच्या रहिवाशांसमोर अशी नोटीस
तामील केल्याची खात्री करून तसा पुरावा कागदोपत्री ठेवून संयुक्त मोजमापे घेण्यात यावीत. अशा प्रकारे नोटीस देऊनही/मिळूनही
गैरव्यवहाराशी संबंधित असलेल्या व्यक्ती संयुक्त मोजणीच्या ठिकाणी हजर न राहिल्यास, त्यांच्या गैरहजेरीत संयुक्त मोजणीची कार्यवाही
करून मोजमाप पुस्तिकेत मापे लिहावीत व अशी मापे अपचारी व्यक्तींना मान्य असतील अशा सूचना लेखी नोटीसमध्ये नमूद कराव्यात.
अशा संयुक्त मोजणीस कामाची तपासणी केलेल्या प्राधिकरणाचा अधिकारी पण हजर राहू शकतो, तसे त्यांनापण कळवावे.

(४) संबंधित काम ज्या कार्यान्वयीन यंत्रणेच्या अखत्यारित असेल त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी (कार्यकारी अभियंता, जिल्हा
अधीक्षक, कृषि अधिकारी, उपसंचालक, उपवनसंरक्षक संबंधित असेल त्यांनी) अशा प्रकारे घेतलेल्या संयुक्त मोजणीस प्रत्येक कामनिहाय
किमान ५ टक्के तपासणी करावी. असा अहवाल संबंधित अधीक्षक अभियंता यांनी पाठपुरावा करून जलद मिळवून घ्यावा.

२. वर उल्लेखिल्याप्रमाणे नोटीस देऊन/मिळूनसुद्धा संयुक्त मोजणीसाठी हजर न राहणाऱ्या व्यक्तीसुद्धा आदेशांचे अनुपालन न केल्याबद्दल
तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतात. अशा प्रकारे संयुक्त मोजणी घेतल्यावर अतिप्रदान झालेल्या रकमेची नोंद घेऊन सुधारित अंदाजपत्रकात
प्रमाणे निलंबन निधी दाखवावा. संबंधित अधीक्षक अभियंत्यांनी संयुक्त मोजमापे योग्य प्रकारे करण्यात आल्याची खात्री करून घ्यावी आणि
अभिप्राय नोंदवून सुधारित अंदाजपत्रकास जोडण्यासाठी संबंधित यंत्रणेकडे पाठवावे.

३. अशा प्रकारे अतिप्रदान झालेल्या रकमेची निश्चिती झाल्यानंतर अधीक्षक अभियंता यांनी तसा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी व
युक्त कार्यालयास एक महिन्याच्या आत पाठवावा. हा अहवाल प्राप्त झाल्याबरोबर संबंधित आयुक्त यांनी अपचारी अधिकारी व कर्मचारी
त्याविरुद्ध एक महिन्याच्या आत तात्काळ नियमाप्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीस सुरुवात करून शासनास अवगत करावे. अशा शिस्तभंगाच्या
तावाबरोबर संबंधित अधीक्षक अभियंत्यांचा अधिक प्रदानाचा पूर्ण प्रस्ताव पुरावा म्हणून जोडण्यात यावा.

४. वरीलप्रमाणे अधीक्षक अभियंत्यांनी निलंबन निधीबद्दल अहवाल दिल्यानंतर संबंधित सक्षम तांत्रिक अधिकाऱ्याने (पाटबंधारे, जलसंधारण,
र्वजनिक बांधकाम, कृषि, वने, सामाजिक वनीकरण) शासनाच्या प्रचलित नियम व कार्यपद्धतीनुसार तांत्रिक मंजुरी देण्याची कार्यवाही करावी
सुधारित अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करावे. म्हणजेच अधिक प्रदान निश्चित होऊन संबंधित कर्मचारी/
धिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित झाल्यानंतरच सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. अशी ही
कार्यवाही ३ महिन्यांच्या आत पूर्ण होणे बंधनकारक करण्यात येत आहे (कार्यान्वयीन यंत्रणेने अधीक्षक अभियंत्यांच्या निदर्शनास आणल्यापासून
प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित करेपर्यंत).

५. अशा प्रकारे कामावर अधिक प्रदान झाल्याचे आढळून आल्यास सुधारित अंदाजपत्रक बनविण्यासाठी व ते मंजुरीसाठी सक्षम
धिकाऱ्याकडे पाठविताना वरील प्रकारची कार्यपद्धती न चुकता अवलंबावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही) दि. मा. मोरे,

मुख्य अभियंता व सहसचिव

(रोहयो), नियोजन विभाग.